महाराष्ट्र शासन

क्र. :जीएनटी १०९९/प्र.क्र.५२/९९/नवि-१६

नगर विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दि: १९ जुलै १९९९

प्रति,

संचालक,

नगरपालिका प्रशासन, मुंबई

विषय : नगरपालिकांना महागाई भत्ता अनुदानापोटी देय होणाऱ्या अनुदानाबाबत.

महोदय,

राज्यातील नगरपालिकांना त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना अदा केलेल्या महागाई भत्त्याच्या प्रतिपूर्तीसाठी देण्यात येणाऱ्या टक्केवारीमध्ये पहिल्या महाराष्ट्र राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पुढीलप्रमाणे वाढ करण्यास शासनाने मान्यता दिली आहे :-

१) "अ" वर्ग नगरपालिका ९०%

२) "ब" वर्ग नगरपालिका १००%

३) "क" वर्ग नगरपालिका १००%

वरील टक्केवारीमुळे एकूण रु. १२.८५ कोटीचा खर्च दर्शविण्यात आला आहे.

सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात महागाई भत्ता अनुदानापोटी एकूण रु. १०३.४० कोटीची तरतूद करण्यात आली असून या रकमेतून १९९८-९९ च्या चौथ्या तिमाही महागाई भत्ता हप्त्याची रक्कम रु. २३,५०,६८,६५२/- वितरीत करण्यात आली आहे. त्यामुळे चालू वर्षातील चार तिमाही हप्ते देण्यासाठी उर्वरित तरतूद अपूरी पडणार आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सन १९९९-२००० मध्ये एकूण किती अतिरिक्त रकमेची तरतूद या सुधारित टक्केवारीनुसार करणे आवश्यक आहे. याबाबतची सविस्तर माहिती तातडीने पाठवावी. तसेच ९९-२००० मधील पहिल्या तिमाही महागाई भत्त्याचा प्रस्तावही त्वरीत पाठवावा अशी आपणास विनंती आहे.

आपला,

(म. शा. शिर्के)

कक्ष अधिकारी